ॐ

# 'स्व'-रूपवर्धिनी कार्यवृत्त

एप्रिल २०२०

२२/१, मंगळवार पेठ, पारगे चौक, पुणे – ४११ ०११.
(कार्यालय दूरध्वनी) : २६१२१७०४ भ्रमणध्वनी : ९०११३८६३८६
Email : wardhinee@gmail.com
Website : http://www.swaroopwardhinee.org

❖ मासिक अंकाची किंमत ५/– ❖ वार्षिक वर्गणी रुपये १००/– (विशेषांकासह)

## सेवा है यज्ञकुंड














## वर्षारंभ उपासना :-



गुढीपाडवा - चैत्र शुद्ध प्रतिपदा निमित्त बुधवार दि. २५ मार्च २०२० रोजी सकाळी ६.०० ते ७.१५ यावेळेत सद्यस्थितीमुळे एकत्र न येता आपापल्या घरी वर्षारंभ उपासना घेण्यात आली. विशेष म्हणजे हा कार्यक्रम फेसबुक लाईव्ह घेण्यात आला, आणि वर्धिनीतील अनेक युवक, युवती व कार्यकर्त्यांना घर बसल्या या कार्यक्रमात सहभागी होता आले.नेहमी प्रमाणे ओंकारेश्वराच्या देवळात न जाता बदलत्या परिस्थितीत ऑनलाइन उपासना आणि मा. रामभाऊ डिंबळे सरांचे मार्गदर्शन झाले. उपासना कशासाठी हे सांगताना ते म्हणाले, " प्रार्थनेने स्वत:मध्ये बदल होतात आणि यामुळे संपर्कात येणाऱ्या व्यक्ती मध्ये, परिणामी समाजामध्ये उत्कर्षाचे सुखासमाधानाचे बदल आपण घडवू शकतो. उपासनेत म्हटल्या प्रमाणे आपण परमात्म्याचे घटक आहोत म्हणून आपल्यात चांगले गुण असले पाहिजेत. आपल्यातील रजोगुण, तमोगुण आपण दूर सारले पाहिजेत. आपण प्रत्येक जण ज्योतीची, तेजाची प्रतिमा आहोत. त्यावर येणारी काजळी झटकली पाहिजे. नकळत पणे प्रसिद्धी च्या मोहात अडकू नये,अंगी येणाऱ्या तमोगुणांना, रजोगुणांना झटकण्याची शक्ती मिळण्यासाठी ही उपासना आवश्यक आहे. उपासनेत सांगितलेला स्वाहाकार कै. किशाभाऊंनी स्वतः कृतीत आणून आपणा सर्वांमध्ये संकल्पाची ज्योत तेवत ठेवली आहे. त्यांच्या प्रत्येक कृतीतून, निष्काम कर्मयोगातून आपल्याला मार्गदर्शन होत असते. किशा भाऊंच्या जन्मशताब्दी वर्षात ठरवलेले पाच संकल्प मोठ्या जिद्दीने, आत्मविश्वासाने आपण पूर्णत्वास नेऊ."

***कै. किशाभाऊंच्या जन्मशताब्दी निमित्ताने मार्गदर्शन***
***विषय - कर्मयोगी किशाभाऊ***
***वक्ते - मा. श्री. रामभाऊ डिंबळे, कार्याध्यक्ष : 'स्व'-रूपवर्धिनी***

## शाखा विभाग :-

**वर्धिनी घराघरांत :-**

'स्व'-रूपवर्धिनी हे ३६५ दिवस चालणारं आनंदालय आहे. सर्वत्र पसरलेल्या कोरोनाचे संक्रमण भारतातही झाल्यामुळे याला आटोक्यात आणण्यासाठी सर्व जनमानसावर एकत्र न येण्याचे, घरीच राहण्याचे बंधन घातले गेले. हे बंधन आपल्या प्रत्येकाच्या हिताचे आहे हे ओळखून ते वर्धिनीच्या सर्व उपक्रमांनी आनंदाने स्वीकारले. आणि मग सर्वांनी आपली वर्धिनी, आपली शाखा, आपली अभ्यासिका, आपली बालवाडी प्रत्येक घरात घेऊन जाण्याचा संकल्प केला. आता आपल्या केवळ १७ शाखा नसतील तर जेवढे वर्धक-वर्धिका, जेवढे युवा तेवढ्या शाखा भरविण्याचा, वर्धिनीशी आपल्या घरांची जोडणी पक्की करण्याचा आणि वर्धिनी घराघरात रुजवण्याचा विचार झाला. मग काय सगळे कार्यकर्ते पूर्ण उत्साहाने तयारीला लागले. तंत्रज्ञानाने दिलेली देणगी पुरेपूर वापरून वर्धिनी घराघरांत सुरु करण्याचा प्रवास सुरु झाला. नियोजन करण्यासाठी बैठका घ्याव्या लागणार मग Skype, zoom, conference call अशा अनेक संसाधनांचा वापर सुरू झाला. विभागश: virtual बैठका पार पडल्या. पालकांचे whatsaap group तयार झाले. रोज घरोघरी जाऊन केला जाणारा संपर्क आता फोन, व्हिडिओ कॉलच्या माध्यमातून सुरू झाला. मात्र यातील प्रेम अन् आपुलकी आटली नाही. नियोजनबद्ध काम हे आपल्या कामाच वैशिष्ट्य.

त्यानुसार एक १५ कलमी कार्यक्रम आखला. त्यात व्यायाम खेळ, योगासने, ध्यान, पुस्तक वाचन व परिचय, शालेय अभ्यास नियोजन, कात्रण वही प्रकल्प , शैक्षिणक App ची माहिती,विज्ञान प्रयोग, घरगुती स्वछता व घरकामात मदत, प्रार्थना व परिपाठ, पद्य, बुद्धवंदना, तुकोबांचे अभंग, किशाभाऊंची पत्र ऑडिओ-व्हिडीओ माध्यमातून, भाषिक विकास उपक्रम, प्रज्ञा विकास, प्रेरणा जागरण व मूल्य वर्धन, पालकांचे whatsapp group तयार करणे, साप्ताहिक बैठकांमधून नियोजन आणि अंमलबजावणी यातून सुरू झाला एक आनंदी प्रवास..

### विधायक बंदी... सुवर्ण संधी... शाखा मनामनात... वर्धिनी घराघरांत...

**वर्धकांचे उत्तम प्रतिसाद मिळालेले निवडक उपक्रम.....**

- **मुलाखत माझ्या आई - बाबांची..**
  वर्धक वर्धिकांनी या बंदीच्या काळात आपल्या घरच्यांना अधिकाधिक जाणून घेऊन त्यांच्याशी त्यांचं नात अजून घट्ट व्हावं या हेतूने हा उपक्रम घेण्यात आला.

- **वस्तू संकलन**
  एका ठराविक अक्षरावरून सुरू होणाऱ्या वस्तूंचा संग्रह करणे असा हा उपक्रम.
  यात वर्धकांचे निरीक्षण आणि भाषिक कौशल्य वाढवणे हा उद्देश होता.

- **धान्यापासून रांगोळी**
  मुलांनी घरात उपलब्ध धान्यापासून अतिशय उत्तम रांगोळ्या बनवल्या.

- **Family painting**
  घरच्या सर्वांनी एकत्र बसून सर्वांच्या हाताचे ठसे वापरून छान painting बनवायचा हा उपक्रम.



## धर्मवीर शंभूराजे शाखा -

या बंदीच्या काळात शंभूराजे शाखा अगदी सुरुवातीपासून आघाडीवर होती. वर्धकांनी व्यायाम,उपक्रमात उत्तम सहभाग घेतला.

याविषयीचा video नक्की पहा - https://youtu.be/7NtPH3KxJ8Y



## समर्थ रामकृष्ण शाखा -

शाखा सातत्याची...शाखा उपक्रमांची...शाखा घरा घरातली...शाखा मना मनातली. कोरोना पार्श्वभूमीवर जरी शाखा बंद ठेवण्यात आली असली तरीही आपले वर्धक त्यांच्या घरात राहून रोज उपक्रम करत आहेत. त्याचे काही फोटो आणि व्हिडीओ मांडण्याचा हा एक प्रामाणिक प्रयत्न.

याविषयीचा video नक्की पहा - https://youtu.be/dfTx-MMBC0w

## भगिनी निवेदिता शाखा -

शाखेने अनेक उपक्रम यशस्वी केले. त्यामध्ये स्वरचित काव्य,उत्कृष्ट रेसिपी स्पर्धा,वक्तृत्व स्पर्धा,पद्य मैफिल अशा अनेक उपक्रमांचा समावेश आहे. गॅस न वापरता आपल्या छोट्या वर्धिकांनी अनेक उत्तम पदार्थ बनवले.

याविषयीचा video नक्की पहा - https://youtu.be/8I03xYqU0Bc



## स्वामी दयानंद सरस्वती शाखा -

या lockdown काळात घरी रहा आणि सुरक्षित रहा असा संदेश देत आहे आमची दयानंद शाखा.

याविषयीचा video नक्की पहा - https://youtu.be/QiZA3xO1tVU

## स्वामी श्रद्धानंद शाखा -

डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त त्यांचे विचार वर्धक आणि पालकांपर्यंत पोहोचवण्यासाठी शाखेच्या युवकांनी माहिती देणारा video तयार केला.

याविषयीचा video नक्की पहा - https://youtu.be/q0aHMd5PZfc





## युवा विभाग :-

# आपदा मदत केंद्र

**"समाज आहे बांधव अपुला"** या भूमिकेतून 'स्व'-रूपवर्धिनी सततच आपल्या सर्व बांधवांसाठी कार्यरत असते. कोरोनाच्या संकटात ज्यांची आर्थिक स्थिती बिकट झाली आहे. अशा बांधवांना अन्नधान्य स्वरूपात मदत करावी असे 'स्व'- रूपवर्धिनीने ठरवले. वर्धिनीने साधारण १५०० कुटुंबांना म्हणजेच प्रत्येक कुंटुंबात साधारण ५ सदस्य असतील तर अश्या ७००० हजार लोकांना महिनाभर पुरेल असे गहू, तांदूळ, तेल,डाळ, मसाले, साखर, शेंगदाणे, मीठ आणि विशेष म्हणजे सॅनिटायझर च्या दोन बाटल्याही या साहित्या सोबत दिल्या. १ एप्रिल पासून २५ एप्रिल पर्यंत वस्तीतील १५०० कुटुंबांना धान्य साहित्याचे वाटप केले. निरनिराळ्या २५ ते ३० वस्त्यांमध्ये अभ्यासिका, शाखा, बालवाडी, बचत गट, संस्कार वर्ग घेणा-या कार्यकर्त्यांच्या माध्यमातून अगदी गरजू असणाऱ्या कुटुंबांपर्यंत हे साहित्य पोहोचविण्यात आले. यासाठी वर्धिनीच्या अनेक देणगीदार व हितचिंतकांनी मदतीचा हात पुढे केल्याने हे घडू शकले. वर्धिनीच्या माध्यमातून समाजबांधवांच्या मदतीला समाजच धावून आला. आणि परत एकदा अनुभूती आली.

***तयांच्या कळा जाणवाव्या आम्हांला... तयांच्या सुखाचीच लागो स्पृहा...***

# रक्तदान मोहीम



कोरोनाचे संकट आले आणि सगळे काही ठप्प झाले, पण युवा विभागाने पुढचे कार्यक्रम डोळ्यासमोर ठेवून नियोजन चालूच ठेवले. त्यात सगळ्यात महत्त्वाचे होते ते रक्तदान शिबीर. दर वर्षी १४ एप्रिल डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जयंती दिनी आपण हे शिबीर घेतो. सध्याच्या परिस्थितीत त्याचे महत्त्व अजून वाढले आहे म्हणून आपण एक दिवस रक्तदान शिबीर घेण्यापेक्षा रक्तदान मास साजरा करून बोधिसत्व बाबासाहेबांना आदरांजली वाहण्याचे ठरवले . सरकारने सांगितलेल्या सर्व आवश्यक गोष्टींची काळजी घेऊन जनकल्याण रक्तपेढी, दिनानाथ रुग्णालय, ओम ब्लड बँक, केइएम हॉस्पिटल अश्या चार ठिकाणी आपल्या २२० कार्यकर्त्यांनी रक्तदान केले. रक्तपेढीच्या सूचनेनुसार काही जणांनी तातडीच्या गरजेसाठी नोंदणी केली.

# 'स्व'-रुपवर्धिनी आणि सदानंद नगर, नातं ४० वर्षांच्या सहवासाचं

सदानंदनगर म्हणजे वर्धिनीच्या इमारतीच्या समोरची वस्ती. तिथे आता वस्तीचा पुनर्विकास होऊन ११ मजली इमारत उभी आहे. पण प्रश्न मात्र तेच आहेत. लहान खोल्या, त्यात राहणारी माणसांची संख्या अधिक, आणखीनही खूप सारे. कोरोनाच्या जनजागरणाच्या हेतूने तेथे राहणाऱ्या आपल्या युवा कार्यकर्त्यांनी सर्व आवश्यक गोष्टींची पुरेपूर काळजी घेऊन डॉक्टरांच्या मदतीने तपासणी केली. एकूण ४७० घरांमधून १५८० जण राहतात. त्या सर्वांची आरोग्य तपासणी अतिशय शिस्तीत, सुरक्षित अंतर पाळून विक्रमी ३ दिवसात पूर्ण केली. तसेच तपासणी झालेल्या प्रत्येकाला मास्क वाटले, आणि घरटी १ सॅनिटायझर दिले. तसेच ज्या कुटुंबातील शिधा संपला आहे आणि आणायला पैसे देखील नाहीत अश्या ५५ कुटुंबाना वर्धिनीच्या माध्यमातून शिधा पोचवला. वर्धिनीच्या कार्यकर्त्यांचे व डॉक्टरांचे धन्यवाद पूर्ण वस्तीने दारात रंगीबेरंगी रांगोळी काढून केले. त्या वेळी कार्यकर्त्यांच्या व डॉक्टरांच्या मनात मात्र भाव होते





***'सेवा धर्म महान खरोखर सेवा धर्म महान***
***वैभव शिखरी राष्ट्र न्यावया प्रशस्त हा सोपान.'***

# पालक मनोगत

आजपर्यंत अनेक प्रसंगात शाखा नेहमीच सोबत होती. आज या करोनाच्या संकटात हातावर पोट असणारे आम्ही अतिशय अडचणीत सापडलो. घरातलं सगळं अन्नधान्य संपत आलं होतं,कामही बंद झालं होतं,काय करावं ते सुचेना. आणि शाखेच्या ताईचा फोन आला. नेहमीप्रमाणे अतिशय आपुलकीने घरची सगळी चौकशी केली आणि पुढच्या काही दिवसांची तजवीज होईल तेवढे धान्य वर्धिनी देणार आहे असे सांगितले. आणि त्यानुसार अतिशय सुरक्षितपणे आमच्या पर्यंत धान्य किट पोहोचले.. त्या दिवशी धान्य घेताना माझे डोळे पाणावले.

इतक्या कठीण काळातही वर्धिनीने केलेली सोबत कधीच विसरू शकणार नाही. आमचं वार्धिनीशी असणार नातं त्या दिवशी आणखी घट्ट झालं.

**- शीतल सुशांत रामरूळे**

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर विधायक जयंती :-

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२९ व्या जयंती निमित्त यंदा आपण घरात राहून, विचारांची जयंती साजरी केली. यात खालील उपक्रम घेण्यात आले...**

- संविधानाने भारतातील प्रत्येक नागरिकांना काही मूलभूत हक्क / अधिकार ( fundamental rights ) दिले आहेत, पण बहुतांश लोकांना ते माहितच नाहीत. म्हणून यंदा कलम १४ ते कलम १९ यांची माहिती पोस्टर द्वारे सर्व युवकांना देण्यात आली.

**युवा विभाग लोकशाही जागर मंचाकडून**

- डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त लोकशाही जागर मंच आयोजित व्हिडिओ वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आली. ह्या कार्यक्रमाला संपूर्ण महाराष्ट्रातून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला कार्यक्रमाद्वारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि त्यांचे विचारधन ह्या या विषयाचे ५० हून अधिक व्हिडिओ आपणास प्राप्त झाले.
- भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त विशेष फेसबुक व्याख्यानमाला घेण्यात आली. विषय आणि वक्ते खालीलप्रमाणे-
- **विषय - डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि सामाजिक समता व जातींचे निर्मूलन.** *वक्ते - डॉ. संजय तांबट*
- **विषय - डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा जीवनसंघर्ष आणि भारताच्या जडणघडणीत योगदान.** *वक्ते - कवी सुरेश गोविंद पवार*

## U lead व्याख्यानमाला :-

### असे वक्ते : असे विषय

| वक्ते | विषय |
|---|---|
| सिद्राम शासम | वेळेचे महत्त्व आणि वाणिज्य शाखेतील करिअरचे पर्याय . |
| संदेश शेंडकर | बँकिंग क्षेत्रातील वाटचाली |
| ललित माळी | आयुष्यातील चढ उतारांना कसे सामोरे जावे ? |
| शिल्पा पोफळे | पत्रकारिता |
| विलास कुलकर्णी | अनुभव कथन यशस्वी उद्योजक |
| सुमित डोळे | इंडस्ट्री 4.0 |
| डॉ. मनीषा नारकर | वर्धिका ते डॉक्टर होण्यापर्यंतचा प्रवास आणि वर्धिनी |
| अरविंद केळकर | 21 व्या शतकातील उद्योगांच्या संधी. |
| मंदार रायरीकर | उद्योगाची पायाभरणी आणि मूलतत्त्वे. |
| विलास कुलकर्णी | आर्थिक नियोजन |
| हर्षद कुलकर्णी | करियर इन बँकिंग |
| योगेश माकणे, विनायक घोटकुले | Law मधील करियरच्या संधी |
| सारंग पोफळे, समीर येनपुरे | प्रशासनातील करियरच्या संधी |
| सुमित पाटील, परिक्षीत मांढरे | वाणिज्य शाखेतील व्यावसायिक अभ्यासक्रम (CA,CS, ICWA आणि CMA) |
| चेतन ठाकरे | Share Market, Mutual Fund |
| संदेश शेंडकर | बँकिंग क्षेत्रातील वाटचाली आणि इंडस्ट्री ४.० |
| विश्वास कुलकर्णी | Short term and long term goals |

## शारदामणी महिला विभाग :-

### रुग्ण सहाय्यक वर्ग :

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर नवीन तंत्रज्ञानाच्या सहाय्याने whatsapp मूळे रोजचा संपर्क सुलभ झाला आहे. रोज सरावासाठी सर्व विषयांवर शिक्षिका प्रश्न पाठवत आहेत. मुलींच्या शंकांचे निरसन करत आहेत.

### * तुम्हा सर्वांना अभिवादन *

वर्धिनीतून सहाय्यक परिचर्येचा अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या भगिनी स्वतःच्या जीवाची पर्वा न करता विविध रुग्णालयांमध्ये रात्रंदिन रुग्णसेवा करीत आहेत.



### शिवण वर्ग :

शिवण वर्गाच्या ताईंनी धान्य वाटप करणाऱ्या कार्यकर्त्यांसाठी कापडी मास्क शिवून दिले यामुळे कार्यकर्त्यांना धान्य वितरण्याचे काम सुरक्षित पणे करता आले.





## पाकोळी बालवाडी विभाग :-

वर्धिनीच्या इतर विभागांप्रमाणे बालवाडी विभागाने देखिल बंदीच्या काळात विविध उपक्रमात सक्रिय सहभाग नोंदवला. विद्यार्थी बालवाडीत येऊ शकत नसतील तरीही वर्धिनीची बालवाडी प्रत्येक मुलाच्या घरी सुरू आहे. यासाठी बालवाडी शिक्षिका तंत्रज्ञानाचा आधार घेऊन आपल्या मुलांशी संवाद साधून त्यांच्या पर्यंत रंगकाम, कागदी वस्तू बनविणे, गाणी, गोष्टी, चित्र काढणे, चिकट काम इ. उपक्रम पोचवत आहेत. त्यानुसार आपण केलेल्या उपक्रमांचे फोटो, व्हिडीओ मुलं आपल्या बाईंना पाठवतात. सर्व मुले आपल्या बाईंचा फोन कधी येईल आतुरतेने वाट पाहतात, असे अनेक मुलांच्या पालकाकडून समजते. यातून मुलांच्या आणि शिक्षिकाच्या नात्यातला जिव्हाळा या काळातही तसाच टिकून आहे याची पावती मिळाली.







# आणि काव्यपंक्ती बहरून आल्या...

## तू आल्यापासून

तू आल्यापासून जरा,आयुष्य बघ बदललं
घरच्यांपेक्षाही कुणी आपलं असतं ,हे तेव्हा मला जाणवलं
हरवून जायचे त्या तीन तासात,कुठे राहायचे गं भान
वर्धिनीच्या झाडाला फुटलं,मुलींच्या दुसऱ्या शाखेचं पान
सावित्री आपली माय ,आपण तिच्या गं ज्योती
शाखेशी गं मैत्री आपली,ठेवू आयुष्य भरासाठी

✍ **पुजा बत्तीन**
*(क्रांतीज्योती सावित्री शाखा)*

## नवस्वप्न शाखेचे...

स्वप्न नव्या शाखेचे,
ऊमेद नव्या चुरशीची..
शोध दृष्टी नव्या पिढीची,
आशा नव्या युवांची..

घेऊनी आलो युद्ध नवे,
झाशीच्या राण्यांपरी..
वसा वंचित स्त्री शिक्षणाचा,
हाती पुस्तक सावित्रीपरी..

कार्यास आशीर्वाद पदोपदी,
जोडली नाती घरोघरी..

✍ **वैदेही**
*(युवती विभाग)*

## प्रिय शाखा...

तुझ्या सहवासाची शिदोरी आता संपत चालली आहे,
तुझ्या बोलवण्याची आता तीव्र ओढ लागली आहे...

इतके दिवस कसा दम धरला माझं मला माहित आहे,
आजही मैदानावर खेळण्याची मी वाट पाहत आहे...

तुझा सहवास ३ तासांचा; २१ तासांनाही लाजवत असे,
तुझं विन आयुष्याला दिशा; कल्पना ही करवत नसे...

शाळा / कॉलेज ची मला कधी आतुरता लागली नाही,
तुझी मात्र मी रोज आवर्जुन वाट पाही...

ते मैदान पुन्हा सजणार आहे फक्कीच्या रेषांनी अन् पाण्याच्या ओलाव्याने,
त्या वर्गात पुन्हा दुमदुमणार आहेत प्रार्थना, पाढे आणि पद्य मोठ्या उत्साहाने...

हे दिवस जाणार आहेत... परत तु फुलणार आहे...
विस्कटलेली घडी मोठ्या जोमाने बसणार आहे...

✍ **अक्षय मुळे**
*(राजश्री शाहू शाखा)*

## उत्थान प्रकल्प (वस्ती विकास प्रकल्प) :-

**उत्थान प्रकल्पाच्या माध्यमातून चालणाऱ्या अभ्यासिका व संस्कार केंद्रावर फेब्रुवारी महिन्यात झालेल्या विशेष कार्यक्रमांचा आढावा.**

**१) आरोग्य मार्गदर्शन सप्ताह -** डॉ. मेहता फाउंडेशन संचालित आरोग्य मार्गदर्शन शिबिर फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यात सर्व अभ्यासिकांवर झाले. डॉ. जोशी सरांनी मुलांना आहार , स्वच्छता व्यायाम याची माहिती वेगवेगळ्या खेळातून दिली. यातून बाहेरील उघड्यावरचे तसेच पिशवीबंद पदार्थ खाऊ नयेत, पाणी जास्त प्यायला हवे, नेहमीच हात-पाय स्वच्छ धुवायला हवेत इत्यादी प्राथमिक स्वच्छतेच्या सवयी मुलांच्या लक्षात आल्या.

**२) मकर संक्रमण उत्सव -** सर्व अभ्यासिकेतील विद्यार्थी व पालक शाखेच्या उत्सवात सहभागी झाले होते. लोहियानगर, गंज पेठ, समता भूमी इथल्या अभ्यासिकांमधील पालकांसाठी विशेष कार्यक्रम झाले. तिळगुळ वाटपासोबत पालक समितीची गरज, मुलांच्या अभ्यासातील अडचणी यावर पालकांशी वर्धिनीच्या कार्यकर्त्यांनी संवाद साधला. पालकांचे मनोरंजनात्मक खेळ घेण्यात आले.

**३)नवीन विस्तार -** कसबा नगरातील कागदीपूरा व महात्मा फुले नगरातील अण्णाभाऊ साठे वस्तीत नवीन अभ्यासिका सुरु झाली.

**४) स्पर्धा -** पंचशील - जुना बाजार अभ्यासिकेत चित्रकला तर काशेवाडी अभ्यासिकेत शुद्धलेखन स्पर्धा झाली. यातून मुलांच्या हस्ताक्षरात झालेला फरक लक्षात आला.

**५) डान्स फॉर एज्युकेशन -** प्रियदर्शनी अभ्यासिकेतील मुलांच्या अंगभूत कलांना वाव मिळावा म्हणून डान्स फॉर एज्युकेशनच्या माध्यमातून काही शैक्षणिक गाणी, नाटिका शिकवण्यात आल्या. पुण्यातील एकूण २२ केंद्राची स्पर्धा २८ फेब्रुवारीला भरत नाट्य मंदिरात झाली. प्रियदर्शनी अभ्यासिकेतील मुलांनी यात भाग घेतला.

**६) स्वच्छता दिन -** सर्व अभ्यासिकांमध्ये राष्ट्रसंत गाडगे बाबा यांच्या जयंती निमित्त अभ्यासिकेत व परिसरात स्वच्छता अभियान झाले. सर्वांनी उत्साहाने सहभाग घेतला परिसर स्वच्छ झाल्याने नागरिकांनी मुलांचे कौतुक केले.

**७) विशेष -** प्रियदर्शनी अभ्यासिकेतील श्रुतिका परदेशी हिला शाळेत वनराई पर्यावरण वाहिनीचे 'इको कॅप्टन' म्हणून बक्षीस मिळाले तसेच तिने वेगवेगळया स्पर्धांमध्ये भाग घेऊन दहा बक्षिसे मिळविली.

**गेल्या दोन महिन्यांच्या बंदीच्या काळात सर्व अभ्यासिका, संस्कार वर्ग यांनी विभागामार्फत घेण्यात येणाऱ्या सर्व उपक्रमात अतिशय उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला. या काळात केवळ फोनच्या माध्यमातून संपर्क करणे शक्य होते पण हा संपर्क अतिशय प्रभावी ठरला पालकांच्या सहकार्यामूळे. पालक आणि मुलांच्या सकारात्मक प्रतिसादामुळे आपल्याला सर्व मुलांपर्यंत पोहोचणे शक्य झाले. या काळात मिळालेला प्रतिसाद दर्शविणारा व्हिडीओ सोबत पाठवत आहोत. याविषयीचा video नक्की पहा -** https://youtu.be/e2o2zDh2j5E

### पालकांच्या नजरेतून...

लॉकडाऊन लॉकडाऊन
मुलांचे मूड पण झाले डाऊन
इथे तिथे हात लावू नको
हात धुतल्याशिवाय खाऊ नको
खाली मुळीच जाऊ नको
अशा एक ना अनेक सूचना ऐकून
मुलांचे मूड झाले डाऊन
अशात साथ वर्धिनीची
घराघरात पोहोचण्याची
जरी मिळाली शाळेला सुट्टी
वर्धिनीशी झाली गट्टी
वेगवेगळ्या स्पर्धा
निरनिराळ्या युक्त्या
आमच्या ताई दादांना सुचतात तरी कशा
लहानांना खिळवून ठेवण्याचे छान आहे तंत्र
आम्हाला पण असाच काही द्या की ओ मंत्र..

✍ **सौ. मोनाली यंदे**
*(पाकोळी बालवाडी शिक्षिका)*

## स्पर्धा परीक्षा केंद्र :-




**श्री. श्रीकांत प्रदीप चिंचोलकर २०११-१२ च्या वर्गाचा विद्यार्थी. महाराष्ट्र शासनाच्या आरोग्य विभागात २०१३ पासून बहुउद्देशीय आरोग्य अधिकारी म्हणून कार्यरत आहे.**

**त्यांचा covid-19 च्या युद्धात कामाचा अनुभव -**

सध्या चंद्रपूर जिल्ह्यात कार्यरत आहे. चंद्रपूर जिल्ह्यात सद्यस्थितीत एकही रुग्ण नाही याचे संपूर्ण श्रेय जिल्ह्यातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांना आहे. मी एक आरोग्य अधिकारी म्हणून संपूर्ण कार्यक्षमतेने काम करत आहे. जिल्हास्तरावरून येणाऱ्या सर्व मार्गदर्शक सूचनांचे पालन करून त्याची कार्यवाही करणे हे माझे मुख्य काम आहे. आम्हाला वाटून दिलेल्या ४ गावांमध्ये मी पर्यवेक्षणाचे काम करत आहे. एका उपकेंद्रामध्ये परिचारिका, आशा ताई, अंगणवाडी सेविका अश्या १०-१२ जणांचा गट काम करतो. त्यांना गावातील सरपंच, पोलिस पाटील, ग्रामसेवक यांचे सहकार्य असते. गावात परराज्यातून/परदेशातून आलेल्या व्यक्तीची माहिती ग्रामस्तरावर कार्यरत असलेल्या कोरोना समितीकडून मिळते. सदर व्यक्तीला १४ दिवसांसाठी home quarantine अथवा institutional quarantine करायचा निर्णय मी वरिष्ठांशी बोलून घेतो. त्याप्रमाणे कार्यवाही होते. गावात बाहेरून व्यक्ती सहजरित्या येऊ नये म्हणून गाव बंदी, नाका बंदी हे उपाय केले आहेत. जिल्ह्याबाहेर/तालुक्याबाहेर जाण्यासाठी नागरिकांना pass system पाळावी लागते. यात महिन्यातून फक्त ६ दिवसच घरातील एका व्यक्तीस pass दाखवून दिलेल्या तारखेस बाहेर पडता येते. त्यामुळे बाहेरील अनावश्यक गर्दी टाळता येते. याप्रमाणे कोरोना विरुद्ध च्या लढाईत सर्व अधिकारी, कर्मचारी आपल्या प्राणांची बाजी लावून कार्य करत आहे. देशहित व सेवाकर्तव्य याची जाण ठेवून सर्वजण दिवसाचे १०-१२ तास काम करत आहोत. सर्व नागरिकांनी सुरक्षित अंतर पाळा व घरीच रहा या आदेशाचे पालन करून आम्हा सर्व कर्मचाऱ्यांना सहकार्य केले पाहिजे एवढीच अपेक्षा आहे.



**'कोण दिवस येईल कैसा, नाही त्याचा भरवसा' संत तुकारामांची ही ओळ आपण सर्वजण जगतो आहोत. एका सूक्ष्म विषाणूने सर्व जगाची धडधड बंद केली आहे. विज्ञान-तंत्रज्ञान बाजूला सारून निसर्गापुढे आपण हतबल झालो आहोत. तरी आपले मनोबल यावरही मात करण्यासाठी दृढ झाले आहे. एक सरकारी अधिकारी म्हणून सेवा बजावत असताना आलेले काही अनुभव :**

धुलीवंदनाच्या सुट्टी नंतर श्रीगोंदयात कार्यालयात रुजू झाल्यावर शासनाकडून कोरोनाबाबत सूचना व आदेश येऊ लागले. आणि कोरोना संकटावर उपाय म्हणून 22 मार्च पासून दैनंदिन जीवनाचा lockdown सुरू झाला. अत्या वश्यक सेवा वगळता सर्व कामकाज बंद झाले.सगळीकडचे व्यवहार ठप्प झाले. जिथे लोकांनी दुकानदारांनी सहकार्य केले नाही तिथे सांगून काहीवेळा कायद्याचा बडगा दाखवत lockdown ची अंमलबजावणी यशस्वी होण्यासाठी प्रशासन रस्त्यावर उतरले. काही दिवसांनी परिस्थिती गंभीर होऊ लागली. शहरातुन आलेल्या मजूर लोकांसाठी एक शाळेत निवारा केंद्र सुरू झाले. गावातील दानशूर लोकांनी त्यांच्या जेवणाची व्यवस्था केली. आम्हाला घरी जाऊ द्या असे म्हणनाऱ्या परराज्यातील लोकांना समजावून, समुपदेशन करून त्याना केंद्रात स्थिर केले. नव्याने येणाऱ्या मजुरांची तपासणी केली. त्यांच्या लहान मुलांचे लसीकरण केले. कार्यालयात आपत्ती व्यवस्थापन कक्ष सुरू करण्यात आला. तालुक्यातील लोक विविध समस्यांसाठी फोन करू लागले.

आमची जेवायची सोय नाही, घरात सगळं संपलं आहे असा फोन आला की माहिती काढून त्या ठिकाणी भेट देऊन, परिस्थिती पाहून समाजातील दानशूर व्यक्तींनी, NGO यांनी तयार केलेले किट, शिधा मिळेल तसे आम्ही पोचवू लागलो. हे करताना स्वतः ला कोरोनापासून रोखण्यासाठी mask, social distancing ह्याची खबरदारी घेऊ लागलो. भेट दिल्यावर काही वेळा मन सुन्न होऊन जाई. पालात कापड, प्लास्टिक चा वापर करून उभारलेल्या छोट्याश्या आडोशात कुटुंब राही. कुठलं जेवण, फॅन, आराम आणि social distancing?

हे पाहून रस्त्यावर कारण नसताना गाड्यांवर फिरणाऱ्या, काळ्या बाजारातुन चढ्या दरात तंबाखू, दारू घेण्याऱ्या लोकांना पाहून समाजातील विषमता आणि विरोधाभास यांनी डोळे भरून यायला लागले.

एप्रिल महिन्यात रास्त भाव दुकानातून प्रति व्यक्ती ५ किलो तांदूळ अन्न सुरक्षा यादीतील लाभार्थ्यांना मिळू लागला. हे वितरण योग्य व्हावे यासाठी सकाळी ८ पासून खेडोपाडी फिरून लक्ष ठेवायला लागलो. धान्य मिळालं तरी तेल, तिखट-मिठाची चिंता ! पण ही व्यवस्था परिपूर्ण नसली तरी आहे याबद्दल खूप समाधान आहे. त्यात कृषी विषयक कामांना lockdown मधून सूट मिळाली तरी बळीराजाला अडचणी होत्याच. गव्हाची कापणी यंत्रे, गुरांचे खाद्य, द्राक्ष बाजारपेठ, भाजीपाला, दूध ह्याबाबतचे प्रश्न सोडवू लागलो. आशा ताई गावात फिरून बाहेरून आलेल्या लोकांच्या हातावर home quarantine चा शिक्का मारून घरातच विलगिकरण करू लागल्या.

एकदा एका दुष्काळी खेड्यात किट वातप करताना गेलो असतानाची गोष्ट. एक वृद्ध माऊली घरात एकटीच होती. मालक वारलेले, मुलगा नाही, मुलगी दूर सासरी. तिची अवस्था पाहून तिची मदत घरात नेऊन दिली. आम्ही निघताना आजीच्या डोळ्यात पाणी आले, म्हणाली," जीव दमतो माझा, या परिस्थितीबद्दल वाईट ही वाटतंय." अशा अनुभवांनी आपण करत असलेल्या निरंतर श्रमाचे चीज होतं आणि उन्हाचा, कोरोनाचा त्रास विसरून परत कामाला जोर येतो. सामना चित्रपटा तील गाणे आठवतं , " कशासाठी उतरावे तंबू ठोकून..." वेगवेगळ्या पातळीवर प्रशासन कामं करीत आहे. रूग्ण संख्या वाढली तर तालुकास्तरावर लक्षणांप्रमाणे mild, moderate आणि severe अशी वर्गवारी करून त्यासाठी रुग्णालय, वसतिगृह ताब्यात घेऊन covid care center व dedicated covid health center उभारली.

मला वाटतं ही लढाई covid-19 ह्या विषाणू बरोबर ची तर आहेच परंतु आपल्यातील अप्रामाणिकपणा, साठेबाजू वृत्ती, माहिती लपवून ठेवणे, चांगली परिस्थिती असताना फुकटच्या मदतीची हाव धरणे ह्या सर्व गोष्टींविरुद्ध आहे. ह्या गोष्टी कोरोनाचे संकट अजून गडद करत आहेत. हा देश माझा आहे, हा समाज-गाव-शहर माझे आहे असा भाव घेणाऱ्या आणि देणाऱ्या लोकांनी ठेवला पाहिजे. आपल्या घरात राहणं इष्ट आहे. काही दिवस संयम बाळगा, नक्कीच उष:काल होणार आहे.

**डॉ. योगिता ढोले,**

*नायब तहसीलदार, श्रीगोंदा,अहमदनगर.*

## MPSC शिष्यवृत्ती बॅच २०१९-२० चा विद्यार्थी संदेश खंडागळे याने रचलेली कविता

